म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. १७६४



# गीत-गौरव

REFBK-0016954
REFBK-0016954



रघु बोरगांवकर

# गीत गौरव

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ४९३५० वि: काव्य
क्रमांक १५६४ नोंद दि. २८।८।६८

रघु बोरगांवकर
नांदेड

REFBK-0016954
REFBK-0016954

व्हीनस बुक स्टॉल
अप्पा बळवंत चौक पुणे २.

प्रकाशक :- सौ. सुलोचना लिमये एम. ए.
व्हीनस बुक स्टॉल
अप्पा बळवंत चौक,
पुणें २.

किंमत :— ·५० पैसे

प्रथमावृती :- २६ जाने. १९६८

मुद्रक :— हरी. कृ. देशमुख, एम्. ए.
सुभाष मुद्रणालय
३९० शनवार पेठ, पुणें २

## अनुक्रमणिका

१) वंदन
२) गण
३) मुजरा
४) प्रतिज्ञा
५) विनंती
६) आम्ही आलो या गांवाला
७) तुझेच आहे तुझ्याच पाशी
८) आपण तरू, लोका तारू
९) घरधनी मी जाते शाळेला
१०) राम लिहा राम
११) हाती घ्या रे काम
१२) विकास योजना गांवात आली
१३) नवे पाऊल [ पंचायत राज्य ]
१४) भर भर कोयता चाले शिवारी [ संकरित धान्योत्पादन ]
१५) सहकाराने राहू या [ सहकार ]
१६) पैसा पैसा बचत करू या [ अल्पबचत ]
१७) संसाराचा वीट मला आला [ कुटुंबनियोजन ]
१८) कोटीमुखाने जय बोला [ संरक्षण ]
१९) चोखयाचा मी पोर [ अस्पृश्यता निवारण ]
२०) आषाढीच्या वारीसाठी [ भक्तिगीत ]
२१) गौरवगीत

१६९५४

## १. वंदन

वंदन देशाला । करू हे । वंदन देशाला
शिरी मुकुट तो हिमालयाचा
उरी हार तो पंचनद्यांचा
अथांग सागर शांत जलाचा
नमितो चरणाला ॥१॥
इथे नांदती शीख इसाई
हिंदू मुस्लीम भाई भाई
संतवीरांची ही पुण्याई
लाभे आम्हाला ॥२॥
जवान इथला अमर जाहला
सोने पिकवी किसान इथला
शास्त्रीजींचा गौरव झाला
धन्य जगी ठरला ॥३॥
भारत आमुचा महान देश
संस्कृती त्याची वंद्य जगास
राखायाची आज आम्हास
जागृती करण्याला ॥४॥
ज्ञानदीप हे लाख उजळले
साक्षरतेचे कार्य चालले
विकास मंदीर नवे बांधले
गौरव जगीं झाला ॥५॥

## २. गण

(चाल :- लवकर यावे सिद्ध गणेशा)

गौरव आधीं गणरायाचा देव खरा हा सकळ गणांचा
कार्यारंभी मुजरा पहिला शाहीर करतो हा मानाचा ।।धृ०।।

भारतमाते मुजरा दुसरा संतवीराच्या या देशाला
तिसरा मुजरा महाराष्ट्राला मराठमोळचा मर्द गडयाला ।।१।।

सह्याद्रीचा सिंह शोभला चौथा मुजरा शिवरायाला
खरी प्रेरणा शिवप्रभूंची साक्षर करणे महाराष्ट्राला ।।२।।

गांवशिक्षण मोहीम आमुची शिक्षण देणे बहुजनाला
मुजरा आता रसिकजनाला साक्षरतेच्या मानकऱ्याला ।।३।।

साक्षर करुनी गांवे सारी गौरव घडवू महाराष्ट्राचा
ज्ञानदीप हा अखंड ठेवू प्रकाश उजळो या देशाचा ।।४।।

# ३. मुजरा

(चाल :–स्वतंत्र)

मराठमोळ्या महाराष्ट्रा घे मुजरा मानाचा
तुझ्या यशाची कीर्ती गातो बोल मराठीचा ॥धृ०॥

× × ×

थाप डफावर कडकडली नि भरला आवेश
वंदन माझे शिवरायाना तुकया ज्ञानेश
संतवीराच्या महाराष्ट्रा घे प्रणाम हा अमुचा ॥१॥

× × ×

सह्याद्रीतून सिंह गर्जना उठली वीरांची
भीमाकाठी गजर दिंडीचा वाणीं संताची
'उदो उदो जगदंबे' घुमतो बोल भवानीचा ॥२॥

× × ×

हिमालयाची हाक ऐकूनी सह्याद्री उठला
दंड थोपटूनी रणी उभा तो लालचिनी भ्याला
सीमेवरती यज्ञ चालला मर्द मराठ्यांचा ॥३॥

## ४. प्रतिज्ञा

(चालः– माझ्या मनाची हौस पुरवा)

साऱ्या गांवाचा विचार ठरला
शिकण्याचा मार्ग आम्ही धरला ।।धृ०।।

जनगणना देशाची झाली
माणस नाहीत खूप शिकलेली
विकासाची कामे त्यानं नडली
देश शिकण्यात अडाणी ठरला ।।१।।

कष्ट करून सोनं हे पिकलं
सावकारान लुटून सार नेलं
या अंगठ्यानं गोत्यांत आणलं
कष्ट करणारा उपाशी बसला ।।२।।

झालं गेलं कशाला चिंता
हिशोब कराल थोड हो शिकता
आपलं सरकार पाठीशीं असता
गांव साक्षर होणार आपुला ।।३।।

## ५. विनंती

(चाल :- तुम्ही संत जन)

तुम्ही शेतकरी। देशाचे आधार
चला व्हा साक्षर। आधीं तुम्ही।

विनंती ही तुम्हा। कराया कारण
उद्धराया जन। भारताचे।

वाढावाया पीक। अधिक अधिक
निवाराया भूक। गरीबाची।

संत म्हणे तुम्ही। नांव कमाविले
सोने पिकविले। एके काळीं।

# ६. आम्ही आलो या गांवाला

( चाल :– सांगा या वेडीला )

आम्ही आलो या गांवाला । तुम्हा सांगण्याला ।
विकासाची गंगा आली या गांवाला ।। धृ०।।

वारकरी तुम्ही पंढरीचे थोर
गांवामध्ये नाही वीणा टाळ चार
पंढरी रूसला । चला भजनाला ।
सरकारी पैसा हा देतो तुम्हाला, सामान घेण्याला ।।१।।

माय मराठीची शिका अक्षरे ती
अभंग तो वाचा ज्ञानेशाची पोथी
पत्र वाचण्याला । राम लिहीण्याला ।
राम अक्षराने दगड तरला, तारील देशाला ।।२।।

सहकारी तत्त्व ध्यानी तुम्ही धरा
ग्रामोद्योग थोडा घरी आता करा
त्याच्या मदतीला । पैसा हा तुम्हाला ।
आणा रंग सोन्याचा काळच्या मातीला ।।३।।

# ७. तुझेच आहे तुझ्याच पाशी

(चाल :– सवाल जवाबाची)

गांवकऱ्यानो तुम्हा सांगतो थाप डफावर कडकडनी
माय मराठी भाषा अमुची ज्ञानेशाची ती वाणी ॥धृ०॥

ज्ञानेशाने रचिला पाया कळस चढविला तुकयाने
अभंग तरले पाण्यामधुनी भोळया भक्ती भावाने ॥१॥

अमृताहूनि गोड लागते ज्ञानेशाची ही ओवी
भूपाळीने देव जागतो भल्या पहांटे ती गावी ॥२॥

नामदेव तो अभंग म्हणता विठू नाचतो तालांत
शिवरायाला धर्म सांगतो रामदास तो श्लोकांत ॥३॥

खडा पवाडा शूर वीराचा माय मराठी भाषेंत
मर्दगडयाला भुरळ पाडते खरी लावणी ठसक्यात ॥४॥

तुझेंच धन हे तुझ्याच पाशी तुला परी ते लाभेना
अक्षर ओळख नाहीं म्हणूनी तुला खरे हे येईना ॥५॥

शाळा शिकण्या लाज कशाला खुशाल पाटी घेऊन जा
ओव्या, आर्या अभंग वाचन सार्थक होईल जन्म तुझा ॥६॥

## ८. आपण तरू, लोका तारू

( चाल :–पंछी बनू, उडती फिरु )

चल भाऊ, आपण जाऊ, शाळा शिकण्या
देशामध्ये रामराज्य आता करण्या ॥धृ०॥
शाळा गांवाला रात्रीची झाली
गोळा गांवकरी तिथं झाली
गुरूजीनी सोय छान केली
अक्षरांची ओळखहि झाली
अभंग वाचू, पाठ करू, भजन करण्या ॥१॥
राजा देशाचा किसान झाला
आली संकटें चोहो बाजूला
लोकसंख्येचा कळस झाला
धान्य पुरेना राजा राणीला
संकरीत पीक काढू पोट भरण्या ॥२॥
होता अक्षर ओळख थोडी
कळे अभंगाची खरी गोडी
रामनामाने पुण्याई जोडी
चालेल मजेंत संसार गाडी
आपण शिकू, शहाणे होऊ, सुराज्य करण्या ॥३॥
रामरायाचा आदर्श ठेवू
शिवरायाचे रूप आठवू
शेती नव्याने आपण करू
गोर गरीबांचे कल्याण साधू
आपण तरू, लोका तारू, मुक्ति मिळण्या ॥४॥

## ७. ...नी मी जाते शाळेला

(चाल :– स्वतंत्र)

घरधनी मी जाते शाळेला ॥ धृ०॥
आहे वयाने जरी मी मोठी
हातामध्ये घेतली पाटी
शिक्षणाची आता नका खोटी
राम येऊ दे लिहिण्यास मजला ॥ १ ॥

नका म्हणू शोभत नाहीं
आता तरी शिकू द्या हो कांही
मी हो अडाणी राहणार नाही
जन्मचुलीत माझा हो गेला ॥ २ ॥

अक्षरांची गोडी लागली
मला वाचू दे पोथी हो सगळी
कामधंद्याची माहिती झाली
गांव शाळेंत सारा हो जमला ॥ ३ ॥

बजावते नीट तुम्ही ऐका
अंगठ्याने दिला खूप धोका
नका उगाच उधळू पैका
चला धनी तुम्ही शिकण्याला ॥ ४ ॥

## १०. राम लिहा राम

(चाल :– स्वतंत्र)

राम लिहा, राम लिहा, राम लिहा राम
आतां करू थोडं देवाच काम ।।
देशाच काम ।। धृ० ।

लहानपणी नाहीं शिकायचं जमलं
अंगठ्यामुळे खूप नुकसान झालं
हिशोब करू आता मोजू या दाम
घामाचा दाम ।।१।।

राम लिहीता दगड तरला
एकजुटीने सेतू तो बनला
आपण लिहू चला देवाचं नाम
मंगल नाम ।।२।।

शाळेच्या मंदीरी गांवकरी या
देवाची देशाची सेवा करू या
भक्तीचं मुक्तीचं करू हे काम
देशाच काम ।।३।।

# ७. [हा]ती घ्यारे काम !

(चाल – स्वतंत्र)

हाती घ्यारे काम आणि मखी म्हणा राम
कामाच्या मदतीला सरकारी दाम ।। धृ०।।

शेतीला पैसा नि बैलाला पैसा
रस्त्याला पैसा नि शाळेला पैसा
पैशासाठीं नाहीं अडणार काम ।। १ ।।

विकासाची गंगा गांवाला आली
विचार कशाला उठा मंडळी
गांवाच नांव करू घेऊन काम ।। २ ।।

शाळा आधीं बांधू गांवाला मोठी
शिक्षणांत नको पोरांची खोटी
मंदीर उभारु गाळून घाम ।। ३ ।।

पंचायत राज्य आपुले आले
जोसांत टाकू या नवी पाऊले
गांवात आणू या राजा हो राम ।। ४ ।।

# १२. विकास योजना गांवात आली

(चाल :– सायबाचं प्वार, लई हुशीयार)

विकास योजना गांवात आली । लेका गांवात आ ले
जादूची कांडी कशी फिरली
अरे बघ, बघ, बघ ॥ धृ०॥

गांव हुता आपला मागासलेला
दारीद्रयाने लेका पुरता गांजला
ततं बी हिन कमाल केली । लेका कमाल केली
जादूची कांडी कशी फिरली
अरे बघ, बघ, बघ ॥१॥

गांवाला मोठी शाळा झाली
औषध पाण्याची सोय झाली
मरीआई आता पळून गेली । लेका पळून गेली
जादूची कांडी कशी फिरली
अरे बघ, बघ, बघ ॥२॥

गांवाला आपण सडक केली
सरकारी मोटार गांवात आली
बाजाराची हिनं सोय केली । लेका सोय केली
जादूची कांडी कशी फिरली
अरे बघ, बघ, बघ ॥३॥

## ७. पाऊल ( पंचायत राज्य )

(चाल :– स्वतंत्र)

लोकशाहीचे स्वप्न आपुले खरेखुरे ठरले
पंचायत राज्याचे पाऊल पहा नवे पडले ॥ धृ०॥

सह्याद्रीच्या शिखरावरती ध्वज फडफडतो यशकीर्तींचा
पहा चौघडा सनई वाजे जय बोला श्री जगदंबेचा
दिंडी आपुली पुढे चालली गजर करीत या महाराष्ट्राचा
लोकराज्य हे लोकासाठीं लोकांचे झाले ॥ १ ॥

पंचायत ही जुनी पुराणी आज नव्याने पहा घडविली
शेतकऱ्यांच्या कामकऱ्यांच्या सत्ता आता हाती आली
पांचामुखी परमेश्वर वदता काळाची ही दिशा बदलली
संत वीरांच्या पुण्याईने राज्य गरीबांचे अवतरले ॥ २ ॥

हात मिळवूनी सहकार्याचा आज टाकू या नवी पाऊले
नव्या योजना नव्या दमाने हाती घेणें कार्य आपुलें
शिवरायाचे मंगल तोरण चला बांधू या वीर मावळे
छत्रपतीच्या महाराष्ट्राचे नंदनवन झाले ॥ ३ ॥

## १४. भर भर कोयता चाले शिवारी (संकरीत धान्य

(चाल–स्वतंत्र)

भर भर कोयता चाले शिवारी
भाग्याची लक्ष्मी आली हो दारी ॥ धृ०॥

हायब्रीडाची आता शंका ना उरली
एकरी चाळीस क्विंटल भरली
देवाने पैशाची खैरात केली
पंढरीची औंदा करू या वारी ॥१॥

हायब्रीडानें गड्या कमाल केली
तीनच महिन्यात रास हो झाली
सरकारी तगाई फिटून गेली
शेतकरी सुखे नांदे शिवारी ॥२॥

लोकसंख्येंचा हो कळस झाला
वाढत्या तोंडाला नाहीं खाण्याला
संकरीत पीके उपाय ठरला
जिद्दीने पिकवू या हायब्रीड ज्वारी ॥३॥

## ७. सहकार्याने राहू या ( सहकार )

(चाल–स्वतंत्र)

सहकाराचे युग नवे हे सहकार्यानें राहू या
एकासाठीं अनेक आपण सर्वांचे हित साधू या ।।धृ०।।

काळचक्र हे पहा उलटले, राव रंक ना आता उरले
समाजवादी समाजरचना लोकशाहीचे ध्येय आपुले
मंगल तोरण त्या ध्येयाचे सहकारानें बांधू या ।।१।।

गांवाला जे सहज साधते ते ना जमते रावाला
सर्वांचे जर हात राबले काय उणे मग भाग्याला ?
सर्वांच्या कल्याणासाठी अनंत हस्ते कार्य करू या ।।२।।

सहकार्याने घाम गाळता सोने होईल मातीचे
सहकार्याने व्यवहार करता ओझे जाईल कर्जाचे
संरक्षण करण्या देशाचे सहकाराचा हात मिळवू या ।।३।।

## १६. पैसा पैसा बचत करू या! [अल्पबचत]

(चाल :—धागा धागा अखंड विणू या)

पैसा पैसा बचत करू या
खऱ्या सुखाचा मार्ग धरू या ।।धृ०।।

पैशासाठीं वणवण फिरूनी, कष्ट उपसले घाम गाळूनी
अर्धपोटी कधी राहूनी काम केले रात्र जागूनी
त्या कष्टाचा, त्या घामाचा, पैसा येता बचत करू या ।।१।।

कणाकणानीं संचय करूनी मुंग्यानी वारूळ बनविले
फुलाफुलांतून थेंब वेचतां मधमाशांचे मोहोळ झाले
आज, उद्याचा संचय करणे पक्ष्यापासून हेंचि शिकू या ।।२।।

थेंब थेंब तळे साचते, पैपैशाने सोने घडते
पैसा असता जग हे अपुलें पैसा नसता शून्य भासते
संकटकाली मित्र खरा हा पैपैशाचे मोल करू या ।।३।।

## साराचा वीट मला आला (कुटुंब नियोजन)

(चाल:– स्वतंत्र)

संसाराचा वीट मला आला
पोराबाळांचा त्रास घरीं झाला ॥ धृ०॥

मला पोरं झाली हो बारा
आणू कुठून त्यांना चारा
शेतीमळा विकला मी सारा
कर्जाचा डोंगर चढला ॥ १ ॥

काय कथा सांगू तुम्हाला
कारभारीण आहे नांवाला
शरीराचा सापळा तिच्या बनला
चूल फुंकून जीव माझा दमला ॥ २ ॥

REFBK-0016954
REFBK-0016954

चुकलो मी सांगतो सर्वाला
दोन पोरं पुरी वंशाला
नका पडू उगा फंद्याला
नियमनाचा कायदा पाळा ॥ ३ ॥

## १८. कोटीमुखाने जय बोला (समरगीत)

१६५५८ ग्रा. क्र. शाखा

शूर मराठे वीर आम्ही
लढलो मुकलो प्राणाला
नाहीं सोडीले सत्त्वाला
कोटी मुखानें जय बोला ॥१॥

देशासाठीं काळीज हे
सह्याद्रीचा सिंह म्हणे
झेप टाकली रणांगणी
हाक मारता आईने ॥२॥

मारू किंवा लढत मरू
सीमेवरती उभा जवान
दुष्काळावर मात करी
घाम गळूनी वीर किसान ॥३॥

चला उठा बांधा कंबरा
इंच इंच पिकवू आता
रक्त तांबडे दान करू
इंच इंच लढता लढता ॥४॥

## १९. चोखयाचा मी पोर (अस्पृश्यता विवारण)

(अभंग)

चोख्याचा मी पोर । उभा या दाराशी
येता एकादशी । आषाढीची ।। धृ०।।

मंदीरांत झाली । धनिकांची दाटी
बडव्याची काठी । माझ्या माथीं ।। १ ।।

तुटली ही वीणा । फुटली ही टाळ
भक्तीची ही माळ । हृदयाशीं ।। २ ।।

काय पाप केले । काय गुन्हा झाला
जातीसाठीं मला । दूर केले ।। ३ ।।

एका देवाची ना । आपण लेकरे
भेदभाव नुरे । देवापाशी ।।४।।

## २०. आषाढीच्या वारीसाठीं ( भक्तीगीत)

( चाल :– अरे संसार संसार)

मेघ दाटले दाटले आला उमाळा भरून
आषाढीच्यां वारीसाठी आला पाऊस दुरून ।।धृ०।।

पावसाची सर नाचे पंढरीच्या वाटेवर
दिंडी चालली पाहून टाळचा पिटीते शिवार ।।१।।

वारा उधळतो बुक्का ओढे नाले नाम गाती
संताबरोबर झाडे भक्तीभावाने डोलती ।।२।।

पावसांत वैष्णवांची दु:खे ओली चिंब झाली
ओल्या पालखीत नाचे मूर्त देवाची सावळी ।।३।।

पंढरीच्या क्षितीजात इंद्रधनुची कमान
स्वागतास चंद्रभागा आली दुथडी भरून ।। ४ ।।

चिखलांत पावसांत दिंडी वाळवंटी आली
ब्रह्म पहाता लोचनी मिठी पायाशी पडली ।। ५ ।।

१२३५०
१५६८
काव्य
२८/८/५८
१९९५४



## २१. गौरव गीत

(चाल :– धौम्यऋषी सांगतसे)

गौरव ग आज सखे आपुल्या ग गावाचा
विद्यादेवी आली घरा सोहळा ग देवीचा ।।धृ०।।
घराघरांतून आज ज्ञानदीप लागले
घर माझे आज सखे प्रकाशानें उजळे ।।१।।
गांव उजळला सारा झाले ज्ञान मंदीर
रस्त्यावर रांगोळ्याचे नक्षीकाम सुंदर ।।२।।
तालुक्यांत गांव सखे आपुला ग गाजला
गांवामध्ये अडाणी ग नाहीं कुणी राहिला ।।३।।
धान्याची ग नांवे सारे सखे आता वाचली
विद्या आणि लक्षुमी ग घरीं मला भेटली ।।४।।
बाजाराची बस मला अक्षराने भेटते
तुळशीची पोथी सखे रोज घरीं वाचते ।।५।।
शहरामध्ये रस्ता मला अक्षराने भेटतो
साक्षरांच्या गांवामध्ये पांडुरंग नांदतो ।।६।।
पैशाच्या ग हिशोबाची वही सखे ठेवली
बचतीच्या पैशामध्ये गाय औंदा घेतली ।।७।।
खुशालीचे पत्र माझ्या बाबाना ग धाडते
आईला ग माझ्या सखे कौतुक ते वाटते ।।८।।
साक्षर ग गांव झाला विद्यादेवी पावली
शाळेमध्ये आपुल्या ग लक्षुमी ही भेटली ।।९।।
अखंड हा दीप जळो प्रार्थना ही देवीला
रामराजा सुखे नांदो आपुल्या ग गांवाला ।।१०।।
ज्ञान दीप लावू चला मंगल हे अक्षर
गांधीजीच्या शताब्दीला देश करू साक्षर ।।११।।